जनसंपर्क कक्ष
30 JAN 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात रविवारी झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद पटकाविलेल्या रोहतक विद्यापीठाच्या संघास प्र-कुलगुरु प्रमोद पाटील, प्रवीणसिंह घाटगे, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत विजेतेपदाचा चषक प्रदान करण्यात आला.

# रोहतक विद्यापीठास विजेतेपद

## चंडीगड उपविजेते : अखिल भारतीय ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धा


लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेमध्ये रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद, तसेच फ्री स्टाइल कुस्ती स्पर्धेचेही सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

ग्रीको-रोमन स्पर्धेत चंडीगड येथील पंजाबी विद्यापीठ उपविजेते ठरले, तर भटिंडा येथील गुरू काशी विद्यापीठास तृतीय स्थान मिळाले. यजमान शिवाजी विद्यापीठाच्या शुभम सिंदनाळे याने १३० किलो वजनी गटात रौप्यपदक पटकावले.

रविवारी ८७ किलो व १३० किलो वजनी गटातील स्पर्धा झाल्या. त्यामध्ये सुवर्ण, रौप्य व कास्यपदक प्राप्त करणाऱ्या कुस्तीपटूंची नावे अनुक्रमे अशी, ८७ किलो : मोहित खुकर (चौधरी चरणसिंग विद्यापीठ, मिरत), सुरजित सिंग (एमजेपी रोहिलखंड विद्यापीठ, बरेली), करमबीर (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर), रामसिंग बलिया (जननायक चंद्रशेखर विद्यापीठ, बल्लिया).

१३० किलो : सतीश (महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक), शुभम सिंदनाळे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), आशिष (सिंघानिया विद्यापीठ, झुणझुणू, राजस्थान), दीपांशू (आयटीएम विद्यापीठ, ग्वाल्हेर).



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात रविवारी झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेतील एक चुरशीचा क्षण.

### सिंदनाळेस रौप्यपदक

स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे दहा कुस्तीपटू सहभागी झाले. रविवारी १३० किलो वजनी गटामध्ये विद्यापीठाच्या शुभम सिंदनाळे व रोहतक विद्यापीठाचा सतीश यांच्यात लढत झाली. सतीशने शुभमवर ५-१ अशी गुणांवर मात केली. त्यामुळे शुभमला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

बक्षीस समारंभास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रवीणसिंह घाटगे, विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रकाश गायकवाड, बंकट यादव, नवनाथ ढमाळ, विजयसिंह यादव, महेंद्र पाटील उपस्थित होते.

30 JAN 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोहतकचे विद्यापीठ सर्वसाधारण विजेते; 'चंदीगढ' उपविजेते

## आंतरविद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धा, शिवाजी विद्यापीठाच्या शुभम सिंदनाळेला रौप्य

**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्री स्टाईल व ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेचा रविवारी समारोप झाला. तीन दिवसांत झालेल्या ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेमध्ये रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतपद, तसेच फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेचेही सर्वसाधारण विजेतपद पटकावले.**

ग्रीको-रोमन स्पर्धेत चंदीगढ येथील पंजाबी विद्यापीठ उपविजेते ठरले, तर भटिंडा येथील गुरू काशी विद्यापीठास तृतीय स्थान मिळाले. यजमान शिवाजी विद्यापीठाच्या शुभम सिंदनाळे याने १३० किलो वजनी गटात रौप्यपदक पटकावले.

शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रवीणराजे घाटगे (कागलकर) सरकार, भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक, डॉ. महादेव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात पुरस्कार प्रदान समारंभ झाला. यावेळी डॉ. प्रकाश गायकवाड, बंकट यादव, नवनाथ ढमाळ, विजयसिंह यादव, महेंद्र पाटील आदी उपस्थित होते. डॉ. विजय रोकडे यांनी स्वागत केले. डॉ. शरद बनसोडे यांनी आभार मानले.

रविवारी ८७ किलो व १३० किलो वजनी गटांतील स्पर्धा पार झाल्या. त्यामध्ये सुवर्ण, रौप्य व कास्यपदक प्राप्त करणाऱ्या कुस्तीपटूंची नावे अनुक्रमे अशी, ८७ किलो : मोहित खुकर (चौधरी चरणसिंग विद्यापीठ, मिरत), सुरजित सिंग (एमजेपी रोहिलखंड विद्यापीठ, बरेली), करमबीर (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर), रामसिंग बलिया (जननायक चंद्रशेखर विद्यापीठ, बल्लिया).

१३० किलो : सतीश (महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक), शुभम सिंदनाळे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), आशीष (सिंघानिया विद्यापीठ, झुणझुणू, राजस्थान), दीपांशू (आयटीएम विद्यापीठ, ग्वाल्हेर).



**कोल्हापूर : ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेच्या सर्वसाधारण विजेतपदाचा चषक रोहतकच्या महर्षी दयानंद विद्यापीठ संघास प्रदान करताना प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील. सोबत प्रवीणराजे घाटगे, डॉ. सुरेशकुमार मलिक आदी. (छाया : तय्यब अली)**

स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे दहा कुस्तीपटू सहभागी झाले. रविवारी १३० किलो वजनी गटामध्ये विद्यापीठाच्या शुभम सिंदनाळे व रोहतक विद्यापीठाचा सतीश यांच्यात लढत झाली. सतीशने शुभमवर ५-१ अशी गुणांवर मात केली. त्यामुळे शुभमला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. तो गडहिंग्लजच्या शिवराज महाविद्यालयाचा कुस्तीपटू आहे. शनिवारी याच महाविद्यालयाच्या रोहन रंडे याने ग्रीको-रोमन कुस्तीमध्ये ९७ किलो वजनी गटात रौप्यपदक पटकावले. अक्षय मंगावडे याने फ्री स्टाईल कुस्तीमध्ये १२५ किलो वजनी गटात विद्यापीठास कास्यपदक मिळवून दिले.

30 JAN 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोहतकचे महर्षी दयानंद विद्यापीठ सर्वसाधारण विजेते

**अ. भा. आंतरविद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धा**



**कोल्हापूर : अ. भा. आंतरविद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतपदाचा चषक रोहतकच्या महर्षी दयानंद विद्यापीठ संघास प्रदान करताना प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील. सोबत प्रवीणसिंह राजेघाटगे आदी.**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात गेले आठवडाभर सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्रीस्टाईल व ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेचा समारोप बक्षीस वितरण समारंभाने झाला. ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेमध्ये रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतपद पटकावले. ग्रीको-रोमन स्पर्धेत चंदीगढ येथील पंजाबी विद्यापीठ उपविजेते ठरले, तर भटिंडा येथील गुरू काशी विद्यापीठास तृतीय स्थान मिळाले. शिवाजी विद्यापीठाच्या शुभम सिंदनाळे याने १३० किलो गटात रौप्यपदक पटकावले.

राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रवीणसिंह राजेघाटगे, भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक, विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत सांगता समारंभ झाला. यावेळी विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, स्पर्धा संचालक दिलीप पवार, तांत्रिक संचालक बंकट यादव, आंतरराष्ट्रीय रेफ्री नवनाथ ढमाळ, विजयसिंह यादव, महेंद्र पाटील आदी उपस्थित होते. डॉ. विजय रोकडे यांनी कार्यक्रमाचे स्वागत तर क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी आभार मानले.

30 JAN 2023 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोहतकच्या दयानंद विद्यापीठाला विजेतेपद

## चंदीगड ठरले उपविजेते; शिवाजी विद्यापीठाच्या शुभम सिंदनाळेला रौप्यपदक

**▶ सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठात गेल्या आठवडाभर सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्रीस्टाईल आणि ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेचा आज समारोप झाला. या स्पर्धेमध्ये रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेच्या सर्वसाधारण विजेतेपदावरही याच विद्यापीठाने नाव कोरले होते.

ग्रीको-रोमन स्पर्धेत चंदीगड येथील पंजाबी विद्यापीठ उपविजेते ठरले; तर भटिंडा येथील गुरू काशी विद्यापीठाला तृतीय स्थान मिळाले. यजमान शिवाजी विद्यापीठाच्या शुभम सिंदनाळे याने १३० किलो वजनी गटात रौप्यपदकाची कमाई केली. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रवीणराजे घाटगे, भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेश कुमार मलिक, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी डॉ. प्रकाश गायकवाड, दिलीप पवार, बंकट यादव, नवनाथ ढमाळ, विजयसिंह यादव, महेंद्र पाटील उपस्थित होते. डॉ. मलिक म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाने कुस्ती स्पर्धा किती पारदर्शक पद्धतीने घ्याव्यात, याचा आदर्श वस्तुपाठच या स्पर्धांद्वारे घालून दिला आहे. त्याबद्दल भारतीय विद्यापीठ महासंघातर्फे आभार मानतो.' यावेळी डॉ. विजय रोकडे यांनी स्वागत केले. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी आभार मानले.

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेचा रविवारी समारोप झाला. त्यात सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक रोहतकच्या महर्षी दयानंद विद्यापीठ संघाला प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रदान केला. यावेळी प्रवीणराजे घाटगे, डॉ. सुरेश कुमार मलिक, महादेव देशमुख, शरद बनसोडे, प्रकाश गायकवाड, आदी उपस्थित होते.**

या स्पर्धेत आज १३० किलो वजनी गटामध्ये विद्यापीठाच्या शुभम सिंदनाळे याने रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठाच्या सतीश याला अत्यंत जोरदार टक्कर दिली. अत्यंत तुल्यबळ झालेल्या अंतिम लढतीत सतीशने शुभमवर ५-१ अशी गुणांवर मात केली. त्यामुळे शुभमला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. शुभम हा गडहिंग्लजच्या शिवराज महाविद्यालयाचा कुस्तीपटू आहे. ८७ किलो वजनी गट ग्रीको-रोमन कुस्तीमध्ये विद्यापीठाच्या विजय डोईफोडे याने पाचवे स्थान प्राप्त केले. विजय हा मुरगूडच्या सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचा कुस्तीपटू आहे.

### ८७ आणि १३० किलोवजनी गटांतील विजेते

स्पर्धेत आजअखेरच्या दिवशी ८७ किलो आणि १३० किलो वजनी गटांतील स्पर्धा पार पडल्या. त्यात सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक प्राप्त करणाऱ्या विजेत्यांमध्ये ८७ किलो : मोहित खुकर (चौधरी चरणसिंग विद्यापीठ, मीरत), सुरजित सिंग (एमजेपी रोहिलखंड विद्यापीठ, बरेली, उत्तर प्रदेश), करमबीर (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर), रामसिंग बलिया (जननायक चंद्रशेखर विद्यापीठ, बल्लिया, उत्तर प्रदेश). १३० किलो : सतीश (महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक), शुभम सिंदनाळे (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), आशिष (सिंघानिया विद्यापीठ, झुनझुनू, राजस्थान), दीपांशू (आयटीएम विद्यापीठ, ग्वाल्हेर) यांचा समावेश आहे.

### विजेत्यांची 'डोपिंग टेस्ट'

या स्पर्धेत सीरिंज सापडल्याचा आणि त्यावर आम्ही केलेल्या कार्यवाहीचा अहवाल भारतीय विद्यापीठ महासंघाला देणार आहे. त्यासह यापुढे असे प्रकार घडू नयेत. प्रामाणिक खेळाडूंना न्याय मिळावा यासाठी या स्पर्धेतील विविध गटांतील पहिल्या तीन क्रमांकांच्या विजेत्यांची रॅंडम्ली डोपिंग टेस्ट करण्याची मागणी आणि शिफारस या अहवालद्वारे करणार असल्याचे महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेश कुमार मलिक यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 JAN 2023
लोकमत

# केंद्र सरकारकडून विद्यापीठाला एक कोटीचा निधी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या 'सोफिस्टिकेटेड एनालिटिकल इन्स्ट्रूमेंट फॅसिलिटी' अर्थात 'सैफ' सेंटरला भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून अत्याधुनिक शास्त्रीय उपकरण खरेदीसाठी एक कोटीचा निधी मंजूर झाला आहे. केंद्राचे संचालक डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी ही माहिती दिली.

डॉ. सोनकवडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने (डीएसटी) सन २०१३ मध्ये शिवाजी विद्यापीठाला 'सैफ' केंद्र मंजूर केले. त्यावेळी विद्यापीठास ५ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता,



शिवाजी विद्यापीठाच्या सैफ सेंटरमध्ये अत्याधुनिक शास्त्रीय विश्लेषण उपकरणे उपलब्ध झाली आहेत.

चार उपकरणेही मंजूर झाली. सध्या हे केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित असून, सार्वजनिक तसेच खासगी क्षेत्रासाठी विश्लेषणाचे काम कार्यक्षमतेने करीत आहे. गेल्या डिसेंबरमध्ये नवी दिल्ली येथे 'सैफ' केंद्राच्या समितीसमोर विद्यापीठातर्फे सादरीकरण करण्यात आले. परिणामी, डीएसटीने सैफ केंद्राला अत्याधुनिक उपकरणाच्या खरेदीसाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

विद्यापीठाला सैफ केंद्राच्या मंजुरीनंतर प्रथमच इतका मोठा निधी मंजूर झाला आहे. सन २०१३-१४ मध्ये कोट्टायम, शिवपूर, पाटणा, धारवाड आणि कोल्हापूर अशी देशभरात चार सैफ केंद्रे मंजूर झाली होती. शिवाजी विद्यापीठातील सैफ केंद्र त्याची सेवा व विश्लेषणाच्या विश्वासार्हतेमुळे खूपच लोकप्रिय बनले. वापरकर्ते विविध नमुन्यांच्या विश्लेषणासाठी या केंद्राला पसंती देतात. त्याचप्रमाणे विविध वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांना देखील या केंद्राचे आकर्षण वाटते.

हे केंद्र अव्याहतपणे सुरू ठेवण्यासाठी आणि क्षमतावर्धनासाठी सातत्याने सहकार्य व मार्गदर्शन करणारे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे आभार डॉ. सोनकवडे यांनी मानले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनीही डॉ. सोनकवडे यांच्यासह संपूर्ण सैफ, डी. एस. टी., सी. एफ. सी. येथील कार्यरत सहकाऱ्यांचे अभिनंदन केले.

पुढारी

# विद्यापीठाच्या 'सैफ' सेंटरला केंद्राकडून एक कोटीचा निधी

## अत्याधुनिक शास्त्रीय उपकरणांची खरेदी होणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या 'सोफिस्टीकेटेड एनालिटिकल इन्स्ट्रूमेंट फॅसिलिटी' (सैफ) सेंटरला भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून अत्याधुनिक शास्त्रीय उपकरण खरेदीसाठी एक कोटीचा निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती केंद्राचे संचालक डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी दिली.

केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागांने (डीएसटी) २०१३ मध्ये विद्यापीठाला 'सैफ' केंद्र मंजूर केले. त्यावेळी विद्यापीठास ५ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर कोला होता. चार उपकरणे मंजूर झाली होती. सध्या हे केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित असून सार्वजनिक व खासगी क्षेत्रासाठी विश्लेषणाचे काम कार्यक्षमतेने करीत आहे.



गेल्या डिसेंबरमध्ये नवी दिल्ली येथे 'सैफ' केंद्राच्या समितीसमोर विद्यापीठातर्फे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. परिणामी, डी.एस.टी.ने विद्यापीठाच्या सैफ केंद्राला अत्याधुनिक उपकरणाच्या खरेदीसाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रा. डॉ. आर. जी. सोनवकवडे यांचे अभिनंदन केले.

30 JAN 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लेखक होण्यासाठी काल्पनिक, मानसिक विश्व निर्माण होणे महत्त्वाचे

## किरण गुरव; शिवाजी विद्यापीठात लेखकांशी संवाद कार्यक्रम

**कोल्हापूर** : लेखनाच्या निर्मितीप्रक्रियेसंबंधी भूमिका मांडत असताना लेखक होण्यासाठी काल्पनिक व मानसिक विश्व निर्माण होणे खूप महत्त्वाची गोष्ट आहे, असे प्रतिपादन लेखक किरण गुरव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त लेखक संवाद मालिकेत ते बोलत होते.

संवादक म्हणून मराठी विभागाचे प्रमुख प्रा. नंदकुमार मोरे व प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी संवाद साधला. याप्रसंगी लेखक गुरव म्हणाले, वाचन हे लेखकाचे पोषणमूल्य असते. ग्रामजीवन, लोकसंस्कृती, लोककला स्त्रीजीवन हेच माझ्या प्रयोगशील कथांचे आशय असून मानवी जगण्यातला संघर्ष, वेगाने बदलत जाणारा काळ ही लेखनाची बलस्थाने आहेत. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ अवनीश पाटील उपस्थित होते. मिरज महाविद्यालयातील मराठी विभागातील प्रा. अविनाश भोरे, प्रा. नीलम पाटील, विलिंग्डन महाविद्यालयातील प्रा. सुवर्णा जाधव, प्रा. वैशाली औताडे, घाळी महाविद्यालयाचे प्रा. दत्ता पाटील, महावीर महाविद्यालयाचे प्रा. गोमटेश्वर पाटील व प्रा. शरद गायकवाड, द. न्यू. कॉलेजचे प्रा. गुंडोपंत पाटील उपस्थित होते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात १३ व्या राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त प्रतिज्ञा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात इन्स्टिट्यूट ऑफ डेमॉक्रसी अँड इलेक्शन्स फॉर गुड गव्हर्नन्सच्या वतीने १३ व्या राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त लोकशाही परंपरांचे पालन करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. तृप्ती करेकट्टी आदी उपस्थित होते.

सकाळ

# राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त शिवाजी विद्यापीठात प्रतिज्ञा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात १३ व्या राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त लोकशाही परंपरांचे पालन करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. विद्यापीठात सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिज्ञा ग्रहण उपक्रम आयोजित करण्यात आला. विद्यापीठाच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ डेमॉक्रसी अँड इलेक्शन्स फॉर गुड गव्हर्नन्स'तर्फे कार्यक्रम झाला. केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी मतदारांसाठीच्या प्रतिज्ञेचे वाचन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. तृप्ती करेकट्टी आदी उपस्थित होते.

सकाळ

# तंत्रज्ञानातील प्रगत उपकरणे आजपासून समजून घेण्याची संधी

## शिवाजी विद्यापीठात 'स्तुती' अंतर्गत प्रशिक्षण

▶सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. २९ : केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे शिवाजी विद्यापीठात उद्या (ता. ३०)पासून ५ फेब्रुवारीदरम्यान स्तुती प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला आहे. विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतील अत्याधुनिक उपकरणे आणि त्याची प्रात्यक्षिके समजून घेऊन त्याचा वापर संशोधकांकडून शोधकार्यात व्हावा, हे या कार्यक्रमाचे मूळ उद्दिष्ट आहे. त्याचे उद्‌घाटन विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अरिंदम भट्टाचार्य हे ऑनलाइन पद्धतीने करणार आहेत. प्र- कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी असणार आहेत.

या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये दिल्ली, पुणे, अमरावती, बंगळूरसह देशातील विविध शहरांतून येणाऱ्या एकूण १४ मान्यवरांची व्याख्याने होणार आहेत. विविध प्रतिष्ठित संस्थांमधून येणारे तज्ज्ञ प्राध्यापक व्याख्याते अतिशय प्रगतशील उपकरणांवर तांत्रिक बाबीची माहिती देणार आहेत. यामुळे विद्यार्थी, संशोधक, शिक्षक, उद्योगपती यांना त्यांच्या नवनवीन कल्पना आणि संशोधन उच्चस्तरावर नेण्यास त्याचबरोबर अत्याधुनिक उपकरणांशी परिचित होण्यास मदत होईल, अशी माहिती 'सैफ सेंटर'चे संचालक प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.